महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार






छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ७७ वा | दिनांक : १८/१२/२०२४ | वार : बुधवार


## ठाकरे-फडणवीस भेटीमुळे शिंदे गटात खरी अस्वस्थता : सुषमा अंधारे



**नागपूर :** येथे विधानसभेचे हिवाळी अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनात उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीमुळे सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. ठाकरे आणि फडणवीस भेटीवर ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. या भेटीमुळे भुवया उंचावण्याचे काही कारण नसल्याचे त्या म्हणाल्या. एका राज्य संस्थेचे प्रमुख म्हणून देवेंद्र फडणवीस यांना भेटण्यासाठी उद्धव ठाकरे गेले होते. भाजप नेत्यांसोबत यापूर्वीही भेटी झाल्या आहेत, असेही सुषमा अंधारे म्हणाल्या.

अडीच वर्षांपूर्वी एकनाथ शिंदे यांनी बंड पुकारत भाजपसोबत सरकार स्थापन केले होते. तेव्हापासून देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांनी एकमेकांकडे सरळ तोंडाने बघितले नाही. मात्र, आज अचानक उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांची त्यांच्या कार्यालयात जाऊन भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. या भेटीवर सुषमा अंधारे यांनी भाष्य करत एकनाथ शिंदेंना टोला लगावला.

देवेंद्र फडणवीस हे फक्त एक व्यक्त नाही तर एका राज्य संस्थेचे प्रमुख म्हणून त्यांना भेटायला उद्धव ठाकरे गेले असल्याचे सुषमा अंधारे म्हणाल्या. सध्या महाराष्ट्रातील जे अनेक प्रश्न आहेत, मराठवाडा अशांत आहे, बीड प्रकरण, परभणी जाळपोळ हिंसाचार असेल, त्यातील जबाबदार पोलिसांच्या बडतर्फीची मागणी असेल, दोन मृत्यू झाले त्याची चौकशी करायची आहे, अशा अनेक मुद्द्यांवर राज्यसंस्थेच्या प्रमुखांशी बोलणं गरजेचे आहे, शिवसेना पक्षप्रमुख ती मांडणी करत असतील तर त्यात काही हरकत नाही, असेही अंधारे यांनी म्हटले.

यापूर्वीही फडणवीस आणि एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले तेव्हा अशी भेट झाली नाही. आताच ही भेट का घेतली, असा प्रश्न विचारला असता भाजप नेत्यांसोबत याआधीही भेटी झाल्या आहेत. त्याच्या बातम्या सुद्धा झाल्या. एकनाथ शिंदे यांनी ज्याप्रकारे विश्वासघात केला, ते कोणालाच आवडणार नाही. शिंदे मुख्यमंत्री होते, तरी फडणवीस हेच खरे सूत्रधार होते. त्यामुळे एकनाथ शिंदे यांना भेटण्याचे कारण नव्हते. शिंदे गटातील निर्णय तेच ठरवायचे. कुठल्या नेत्याने निवडणूक लढायची, कुठून लढायची, कुणी नाही लढायची, हे सर्व फडणवीसच ठरवत होते, असा दावा सुषमा अंधारे यांनी केला.

भाजप-शिवसेना पुन्हा एका होणार का? असा प्रश्न विचारला असता उद्धव ठाकरे भेटायला गेले म्हणजे पॅच अप होणार आहे, हातात हात घालून बाहेर येणार आहेत, आता फडणवीस शिंदे-अजितदादांचा हात सोडणार आहेत, असे होणार नसल्याचे सुषमा अंधारे म्हणाल्या. या सर्वामुळे खरी अस्वस्थता शिंदे गटातील लोकांची व्हायला हवी, असा टोलाही त्यांनी लगावला.

## उद्धव ठाकरे यांनी घेतली देवेंद्र फडणवीस यांची भेट



**नागपूर :** राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनाचा आजचा दुसरा दिवस आहे. काल पहिल्याच दिवशी शोक प्रस्ताव असल्यामुळे कोणत्याच मुद्द्यावर चर्चा झाली नाही. मात्र, विधान परिषदेमध्ये बीड येथील हत्येप्रकरणी तसेच विधानसभेमध्ये परभणी येथील घटनेवर विरोधकांनी मुद्दा उपस्थित केला. या दोन्ही मुद्द्यावर सरकारी पक्षाच्या वतीने चर्चेची तयारी दाखवण्यात आली. मात्र, आज चर्चा घेण्यात आली नाही. त्यामुळे काँग्रेसने कामकाजावर बहिष्कार टाकला. तर आमदार संदीप क्षीरसागर आणि आमदार नमिता मुंदडा यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित करत वाल्मिक कराड याला तात्काळ अटक करण्याची मागणी केली.

उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची देखील भेट घेतली. या भेटीमध्ये ठाकरे यांनी दोघांनाही शुभेच्छा दिल्या. तसेच विधान सभेतील विरोधी पक्ष नेते पदाबाबतही या नेत्यांमध्ये चर्चा झाली असल्याची माहिती समोर आली आहे.

उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीवीस यांची भेट घेण्यासाठी त्यांच्या दालनात पोहोचले. या दोन्ही नेत्यांमध्ये १० ते १५ मिनिटे चर्चा झाली. नागपूर अधिवेशनादरम्यान आज उद्धव ठाकरे पहिल्यांदाच विधिमंडळात आले होते. या दरम्यान त्यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. तसेच मुख्यमंत्री म्हणून फडणवीस यांची ठाकरेंनी पहिल्यांदाच भेट घेतली. या वेळी ठाकरेंनी फडणवीसांना शुभेच्छा देखील दिल्या.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002


## एससी, एसटी, ओबीसींनी आता सामाजिक युती करावी : प्रकाश आंबेडकरांचे आवाहन



**मुंबई :** एससी, एसटी आणि ओबीसींनी नेहमी एकत्र राहावे, सामाजिक युती करावी आणि राजकीय सत्ता स्वत:च्या हातात घ्यावी, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी ट्विटद्वारे केले आहे. ज्या निरुपयोगी लोकांना तुम्ही तुमचे मत दिले, ते तुमच्या संकटाच्या काळात गायब झाले. त्यांनी तुम्हाला वाऱ्यावर सोडून दिले, असा आरोपही प्रकाश आंबेडकर यांनी केला.

परभणी येथील संविधानाच्या विटंबनेप्रकरणी महाविकास आघाडीचे नेते कुठे आहेत ? असा सवाल वंचित बहुजन आघाडीने उपस्थित केला आहे. महाविकास आघाडीने लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीत संविधानाच्या मुद्द्यावर मते घेतली. पण परभणी घटनेच्या विरोधात आवाज उठवला नाही. या पार्श्वभूमीवर ॲड. आंबेडकर यांनी एससी, एसटी आणि ओबीसी यांनी एकत्रित येण्याची गरज असल्याचे म्हटले आहे.

एससी, एसटी आणि ओबीसींनी नेहमी एकत्र राहावे, सामाजिक युती करावी आणि राजकीय सत्ता स्वत:च्या हातात घ्यावी. ज्या निरुपयोगी लोकांना तुम्ही तुमचे मत दिले, ते तुमच्या संकटाच्या काळात गायब झाले आणि तुम्हाला वाऱ्यावर सोडून दिले. आपला लढा हा आपल्यालाच लढावा लागेल, हे आपण कधी शिकणार? असा सवाल करत अजूनही वेळ आहे, समजून घ्या, असे आवाहन प्रकाश आंबेडकरांनी केले.

कुठे गेली काँग्रेस अन् काँग्रेसचे नेते? कुठे गेली शरद पवार राष्ट्रवादी, उद्धव ठाकरे शिवसेना?, कुठे गेले संविधानाच्या नावावर मते मागणारे? कुठे गेले निर्भय बनोचे लोक?, कुठे गेले एससी आरक्षित मतदारसंघातील सर्व आमदार?, शेवटी फक्त आपलेच लोकं आले, अशा आशयाची सोशल मीडिया पोस्ट वंचित बहुजन आघाडीच्या एक्स हँडलवरून करण्यात आली होती. त्या पोस्टला प्रतिक्रिया देत प्रकाश आंबेडकर यांनी उपरोक्त आवाहन केले.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १८ डिसेंबर २०२४

# 'चाकोली'च्या निमित्ताने - रतन आडे




महाराष्ट्रातील ज्येष्ठ साहित्यिक कथा कादंबरीकार बाबारावजी मुसळे यांचा नेमकाच त्यांचे कुटुंबीय आणि वाशिमकरांनी त्यांचा अमृतमहोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला. तमाम त्यांच्या चाहत्यांसाठी व वाचकांसाठीचा हा साहित्यिक सोहळाच होता. यानिमित्ताने वांड:मय क्षेत्रातील अनेक नामवंतांनी हजेरी लावली होती. यावेळी त्यांच्या वाङ्मयासंबंधी विचारमंथन झाले. सरांच्या विविध पैलूंना सोहळ्याद्वारे पूर्णत्व प्राप्त झाले. सर कवी -कथाकार यापेक्षा कादंबरीकार म्हणून सर्वदूर परिचित आहेत. या महोत्सवाचा एक भाग म्हणून चाकोली या ग्रंथाची निर्मिती झाली.

**चाकोली शीर्षकामागील समर्पकता-

चाकोली हा अस्सल ग्रामीण बोलीतला शब्द आहे .तो ग्रामीणभागात मोठा आयाम घेऊन वापरात येत असतो. महानगरीय वाचकाला याचा चाकोरी हा प्रमाणित शब्द ज्ञात आहे. कृषक संस्कृतीशी या नावाचा जवळचा संबंध आहे .ऋतू कोणताही असो चाकोली ही ठरलेलीच असते.तिचा ठळकपणा कमी जास्त असू शकतो.

पूर्वी शेतीतले सर्व व्यवहार बैलगाड्यांच्या माध्यमातून व्हायचे. रस्तेही पक्के नव्हते. गाडी पुढे जात असे तेव्हा तिच्या चाकांची निशाणी मागे चाकोलीच्या रूपात उमटत जाते. याच निशाणीवरून गाडी अनेकदा जात येत राहिली की त्यापासून गाडीवाट तयार होत जाते. एकल चाकोली वरून माग ,त्याची दिशा ठरविता येते.जे व्यवहारांमध्ये महत्त्वपूर्ण आहे. प्रत्येकाचे जीवनसुद्धा चाकोलीबद्ध असते. तिच्यावरून आयुष्याची गाडी पुढे जात असते आणि आपण केलेल्या कामांच्या संदर्भात आठवणींची चाकोली मागे उरत असते . प्रत्येकाचे जगण्याचे पैलू वेगवेगळे असतात .वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करताना ते स्पष्ट होत जातात.त्यांत साहित्यिक पैलू फार महत्त्वाचा मानला जातो. प्रस्तुत 'चाकोली' ग्रंथात ख्यातनाम कादंबरीकार, कथाकार, कवी ,त्यातही एक उत्तम व्यक्ती म्हणून ज्यांनी स्वतःचं संपूर्ण आयुष्य लेखणीच्या हवाली केलं त्या साहित्यिक बाबारावजी मुसळे यांच्या समग्र जीवन आणि कार्याचा आढावा घेत ही 'चाकोली' ठसठशीत रूप धारण करून आलेली आहे. म्हणून या ग्रंथाचे 'चाकोली' शीर्षक हे सर्वार्थाने मला समर्पक वाटते.

**विकारविरहित अवस्था-

चाकोली या अमृत महोत्सवी विशेष ग्रंथांमध्ये बाबारावजी मुसळे यांच्या संदर्भात सारं काही आहे .ज्यामुळे अभ्यासकांना बाबाराव मुसळे समजून घेणे अधिक सोपे जाईल. या ग्रंथाचे संपादक प्रदीप खेतमर या ग्रंथाच्या निर्मितीत आपला आत्मा ओतलेला आहे. त्यांनी या ग्रंथास सात विभागांत विभावित केले आहे. 'चाकोली'च्या अंतरंगात प्रवेश करताना बाबाराव मुसळे यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांची मुद्रा सार्थ ज्ञानेश्वरी मधल्या एका ओवीने केली.त्यातून त्यांनी रागलोभादि पलीकडे जाऊन एक निर्विकारावस्था प्राप्त केली हे स्पष्ट होते. त्यामुळे चाकोली वाचताना वाचकांनीही विकारविरहित होऊन वाचावे म्हणजे बाबाराव मुसळे हे सर्व अर्थाने समजून घेता येतील.

**अंतरंगात डोकावताना-

'चाकोली'च्या पहिल्या विभागामध्ये वेगवेगळ्या मान्यवरांना बाबाराव मुसळे व्यक्ती म्हणून कसे वाटले याचा उहापोह केला गेला आहे .स्वतंत्र व्यक्तीबद्दल जेव्हा लिहिलं जातं तेव्हा त्यांनी बाबारावांशी माणूस म्हणून आलेले अनुभव कथन केले आहेत. सरांचे साहित्यिक अंग वजा करता त्यांना वैयक्तिक पातळीवर मांडणेही भले कठीण असणार आहे. डाॅ. रवींद्र ठाकूर, देविदास फुलारी, अरुणा सबाने, बाळासाहेब लबडे, ऐश्वर्य पाटेकर, सानिका खेडकर, मोहन शिरसाट, प्राचार्य भास्कर गायकवाड, सोपान कांबळे,विकास देशमुख, विष्णू जोशी, संदीप मुसळे,गजानन वाघ ह्या सर्वांचे लेख वाचल्यानंतर वाचकाच्या डोळ्यासमोर व्यक्ती म्हणून सर सहज उभे राहतात. हे लेखन चित्रशैलीदार पद्धतीने अवतरले आहे.

दुसऱ्या विभागात बाबाराव मुसळे यांच्यावरील काव्यांजली फुलताना दिसते. त्यांच्या तरल स्वभावाला व तरल साहित्य लेखणीला अनेक नामवंत कवींनी शब्दबद्ध केले आहे. विठ्ठल वाघ ,इंद्रजीत भालेराव ,प्रशांत असनारे यांनी आशयघन कविता जन्माला घातल्या आहेत . मोहन शिरसाट, महेंद्र ताजणे या वाशीमकर कवींनी त्यांच्या सर्जनाचा सुंदर हवाला दिला आहे. प्रशांत मुसळे हा सरांचा पुतण्या. यांनीही सरांवर अभंग लिहून त्यांच्या स्वभावाची मार्मीक उकल केली आहे. सरांसारख्या कविता लिहिणाऱ्यावरच इतरांनीही कविता लिहिल्या यापेक्षा सुदैव कोणते म्हणावे.

आयुष्याची जडणघडण ही नात्यागोत्यांतूनच होत असते. माणूस वयानुसार कसा बदलत जातो याची जाण नातेवाईकांइतकी इतरांना नसते म्हणून खेतमार यांनी तिसऱ्या विभागात सरांच्या जवळच्या नात्यातल्या व्यक्तींच्या लेखणीतून सरांच्या आयुष्यासंबंधित महत्त्वाच्या घटना व त्यामागील मनोभाव यांची सुंदर विवेचनात्मक मांडणी करणारे लेख संपादित केले आहेत. त्यातून अभ्यासक - वाचकांना आजवर अज्ञात असलेली माहिती या निमित्ताने उपलब्ध होते. यात भाऊ, बहिणी, पत्नी, मुलं -मुली, सुना आणि नातवंडं या सर्वांनी आपल्या नानांच्या प्रेमासह विविध स्वभाव-वैशिष्ट्यांचे सुरेख वर्णन केले आहे. ही खऱ्या अर्थाने अनटोल्ड स्टोरीच आहे. असते ती फक्त आप्त व मित्रांकडूनच प्राप्त होत असते. मुळात राग, तापटपणा, हट्टीपणा हे सारं आज सरांच्या संबंधाने अशक्य वाटायला लागते. साहित्यात एवढा वेडा झालेला माणूस विस्तारलेलं कुटुंब प्रेमाच्या साखळीत एवढे जखडून ठेवू शकतो याचं उदाहरण समाजात क्वचितच सापडते.

आमचा बाबाराव मोठा लेखक झाल्यांचा अभिमान त्यांच्या ज्येष्ठ बंधू - साहेबरावांना वाटत आहे. आम्ही सर्वजण त्यांच्यामुळे महाराष्ट्राच्या कॅनव्हासवर आहोत याचा त्यांच्या पत्नी आणि इतर इप्तांना सार्थ अभिमान आहे. म्हणून हा विभागही अभ्यासक-वाचकांसाठी महत्त्वाचा आहे. कुटुंबाला एका सूत्रात बांधून प्रसंगी आलेल्या अडचणी कशा सोडवत नात्यांत अंतर पडू द्यायचे नाही ही कमालीची कला दर्शविणारा हा विभाग खूपच हृद्य ठरतो.

'चाकोली'मधील चौथ्या विभाग बाबाराव मुसळे यांच्या कादंबरीवरील चिंतन चर्चेचा असून तो अभ्यासकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. इतर विभागांपेक्षा हा विभाग खूप मोठा आहे .याचे कारणही तसेच आहे.आतापर्यंत प्रकाशित एकूण बारा कादंबऱ्यांचा सविस्तर विचार नव्या- जुन्या अनेक समीक्षकांनी या विभागात मांडला आहे. अनेक विद्यापीठांत त्यांच्या कथा- कादंबऱ्या विद्यार्थी - पीएच.डी.अभ्यासकांकडून अभ्यासल्या जात आहेत. बाबाराव मुसळे यांच्या जीवनाची जमापुंजी म्हणजेच हा विभाग आहे. सरांनी सर्वात जास्त वेळ कादंबरी लेखनाला दिला असल्याने वाचक-अभ्यासकांनीही लेख,पत्रे या रूपांत सर्वात जास्त प्रतिक्रिया येथे आलेल्या आहेत.२१ लेख आणि ३५ पत्रे एवढा जबर हा ऐवज आहे.'चाकोली'च्या बेंबीत दडलेली ही खास कस्तुरी आहे.अशाच पद्धतीने सरांच्या कथा-कवितांबाबतही नंतरच्या विभागात लेख,पत्रे यांसह एक समृद्ध ऐवज मांडण्यात आला आहे.विभागात आणखी एक महत्त्वपूर्ण विषयाचा समावेश आहे तो म्हणजे मुलाखत एकूण सहा जणांनी सरांच्या घेतलेल्या मुलाखती यात अंतःर्भूत आहेत. या मुलाखतींतून सरांच्या आयुष्यांचा सर्वांगीण पट उघड करता आला आहे.शेवटी सरांचा दीर्घ परिचय दिलेला आहे.

**'चाकोली'ची उपयोगितासरांच्या साहित्याचा पट मोठा आहे .चाकोलीत १२ कादंबर्या,३ कथासंग्रह, एक कवितासंग्रह एवढ्याचाच विचार केला आहे.या ग्रंथाची निर्मिती प्रक्रिया सुरू झाल्यावर दोन कथासंग्रह ,एक कविता संग्रह प्रकाशित झाले. सर वयाची पंच्याहत्तरी पार पाडल्यावरही आज लिहिते आहेत.त्यामुळे चाकोली हा त्यांच्या समग्र साहित्याचा पराशर्श घेणारा आहे असे म्हणता येणार नाही.त्यांच्या एकूण साहित्याचा अभ्यास करणारा महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांत केला जात आहे.महाराष्ट्रभरातून अनेकांनी त्यांच्या साहित्यावर पीएच .डी.प्राप्त केल्या आहेत.अनेकजण करत आहेत.जे सध्या अभ्यास करत आहेत किंवा जे भविष्यात अभ्यास करतील त्यांच्यासाठी ' चाकोली' हा ग्रंथ अत्यंत उपयुक्त ठरणारा आहे.तसा babaraomusale.blogspot.com या नावाचा त्यांचा ब्लॉगही उपलब्ध आहे. ते स्वतः तो आजही अपडेट ठेवतात.म्हणजे सॉफ्ट माध्यम म्हणून 'चाकोली' आणि साॅफ्ट माध्यम म्हणून ब्लॉग अभ्यासकांच्या सेवेत हजर आहे.म्हणूनच या ग्रंथाचे संपादक प्रदीप खेतमर आणि त्यांचे सहसंपादक मंडळ यांचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे.या ग्रंथाच्या मुखपृष्ठ आणि मलपृष्ठावरील छायाचित्रे गुणी ,युवा छायाचित्रकार श्रेयस पसारकर यांची आहेत.

**रतन आडे, हिंगोली**
- मो. +९१९६५७२३८३०४-

चाकोली (व्यक्तीविशेष ग्रंथ)-
संपादक- प्रदीप खेतमर-
प्रकाशक-गोल्डन पेज प्रकाशन,पुणे-पृष्ठे-२९६/किंमत - ४००/-- ग्रंथ उपलब्धता-
- १) बाबाराव मुसळे- ९३२५०४४२१०,
- २) गोल्डन पेज प्रकाशन, पुणे +९१९५५२३४०१६७
- ३) पाप्युलर बुक सेंटर, अमरावती- +९१९८३४०६५९७०

# कृषी महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात




**अकोला :** महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या उपजत कलागुणांना वाव देणाऱ्या ६६ व्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन कृषी महाविद्यालयात १३ ते १५ डिसेंबर दरम्यान करण्यात आले होते.

स्नेहसंमेलन विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळाला.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचे अध्यक्षतेत १३ डिसेंबर रोजी स्नेहसंमेलनाचे उद्घाटन झाले होते. याप्रसंगी सुप्रसिद्ध हास्य कवी "गुलेर" फेम नरेंद्र इंगळे यांची उपस्थिती होती. विविध राज्यातील विद्यार्थ्यांनी मराठीतून गायन भारुड आणि लावणीत सहभाग घेतला.

स्नेहसंमेलनाचा बक्षिस वितरण समारंभ १५ डिसेंबर रोजी कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. राजेंद्र गाडे यांचे अध्यक्षतेत स्व. के. आर. ठाकरे सभागृहात पार पडला. याप्रसंगी अतिथींच्या हस्ते पारितोषिके वितरण संपन्न झाले. वार्षिक स्नेहसंमेलनाच्या आयोजनात अधिष्ठाता कृषी डॉ. श्यामसुंदर माने यांच्या मार्गदर्शनात कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. राजेंद्र गाडे, प्रा. डॉ. राजेंद्र वाळके, डॉ. वीरेंद्र ठाकूर, डॉ. मनोज मारावार, डॉ. दिलीप धुळे, डॉ. गिरीश जेऊघाले, डॉ. सुधीर दलाल यांच्यासह अधिकारी-कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १८ डिसेंबर २०२४

# जे ई एस महाविद्यालयात महिला स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन





**जालना (प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे)** : जे ई एस महाविद्यालय व इनरव्हील क्लब ऑफ सेंटर जालना तर्फे महिला स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रमाची तीन दिवसीय कार्यशाळा महाविद्यालयात आयोजित करण्यात आली होती. यावेळी जालना सायबर गुन्हे अन्वेषण शाखेचे श्री संजय सोनवणे यांनी महिलांनी संरक्षण कसे करावे याविषयी माहिती सांगितली.

महिला स्वसंरक्षण कार्यशाळेच्या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य प्रा.प्रवीण बाफना हे होते ,व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून सायबर गुन्हा अन्वेषण शाखा जालन्याचे श्री संजय सोनवणे, तसेच महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका प्रा.करुणा वासनिक, पर्यवेक्षक डॉ. सुमंत बिक्कड, कार्यक्रमाच्या संयोजका, इनव्हीलर क्लब ऑफ सेंटर जालनाच्या अध्यक्षा प्रा. शिल्पा कवाना उपस्थित होत्या.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना श्री संजय सोनवणे म्हणाले की महिलांनी व मुलींनी स्वसंरक्षण करण्यासाठी समाजातील दृष्ट प्रवृत्तीच्या लोकांपासून सावध राहून, काही वाईट प्रसंग घडल्यास त्वरित ११२ नंबर ला डायल करावे, १९ २० हा नंबर डायल करून सायबर गुन्हे शाखेत आपली तक्रार दाखल करावी यामुळे त्वरित मदत प्राप्त होऊन संबंधित गुन्हेगारास चौकशी साठी ताब्यात घेण्यात येते . स्थानिक पोलीस ठाण्यातही महिला तक्रार दाखल करू शकतात.

सध्या ऑनलाईन फसवणुकीचे गुन्हे मोठ्या प्रमाणात घडत असून महिला मुलींची व नागरिकाची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत आहे यापासून सावध राहावे. कुठल्याही आमिषाला व गोड बोलण्याला बळी पडू नये, संबंधित व्यक्ती फ्रॉड वाटल्यास त्वरित तक्रार दाखल करावी असेही श्री सोनवणे यांनी सांगितले.यावेळी अध्यक्षीय समारोप करताना प्राध्यापक प्रवीण बाफना म्हणाले की सध्या ऑनलाईन फसवणूक मोठ्या प्रमाणावर होत आहे. यामधे समाजातील प्रतिष्ठित वर्ग सुद्धा बळी पडताना दिसतो.

ऑनलाइन व सोशल मीडियावर ठगांचे प्रमाण जास्त झालेले आहे यापासून सर्वसामान्य नागरिकांनी युवक -युवतींनी सावध राहावे, असेही श्री बाफना यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. वर्षा झवर यांनी केले. तर तर उपस्थितांचे आभार प्रा. कविता बागडी यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थिनी व महिला प्राध्यापिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# परभणी येथील घटनेच्या निषेधार्थ मुरूम कडकडीत बंद



मुरूम, ता. उमरगा येथे परभणी येथील घटनेत पोलीसांनी केलेल्या मारहाणीत मृत्युमुखी पावलेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूची सखोल चौकशी करण्याच्या अनुषंगाने शहर कडकडीत बंद.

**मुरूम, ता. उमरगा, (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : परभणी येथील घटनेत पोलीसांनी केलेल्या मारहाणीत मृत्युमुखी पडलेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूची सखोल चौकशी व्हावी. संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यास तात्काळ निलंबित करून कठोर कारवाई करावी व संविधान प्रतिकृतीची विटंबना करणाऱ्या देशद्रोह्यास कठोर शिक्षा द्यावी. अशी मागणीचे निवेदन रविवारी (ता. १५) रोजी मुरूम येथील संविधान प्रेमी भीमसैनिकांकडून प्रशासनाला देवून मुरूम शहर कडकडीत बंद ठेवण्यात आले. रिपब्लिकन सेनेचे आनंदराज आंबेडकर यांनी १६ डिसेंबर रोजी महाराष्ट्र बंदची हाक दिली होती. त्यात मुरूम येथील संविधान प्रेमी, भीमसैनिक यांच्यावतीने मुरूम सोमवारी (ता. १६) रोजी बंद पुकारून शहरात मोर्चा काढण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोर्चाचा समारोप करून पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप दहिफळे यांना घटनेच्या निषेधाचे व घटनेस जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्याचे निवेदन देण्यात आले. यावेळी सरकार भिमराज ग्रुपचे अध्यक्ष आनंद कांबळे, वीर भगतसिंग विद्यार्थी परिषदचे किरण गायकवाड, सुरज कांबळे यांच्यासह असंख्य संविधान प्रेमी भीमसैनिक उपस्थित होते. मोर्चेदरम्यान अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांकडून चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता

# राज्यपालांनी शपथविधीची अधिसूचनाच काढली नाही : भास्कर जाधव यांचा दावा



**नागपूर** : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार भास्कर जाधव यांनी मंगळवारी विधानसभेत राज्यपालांनी विद्यमान महायुती सरकारच्या शपथविधीची अधिसूचनाच काढली नसल्याचा धक्कादायक दावा केला. त्यांच्या या दाव्यानंतर सत्ताधारी पक्षाने त्यांच्यावर जोरदार पलटवार करत ते वैफल्यग्रस्त झाल्याचा आरोप केला. यामुळे सभागृहाचे कामकाज चांगलेच तापले होते. दरम्यान, राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात ६० वेळा माझे सरकार असा उल्लेख केला. हे तुमचे सरकार कसे झाले? याचा विचार करा, असेही जाधव यावेळी म्हणाले.

भास्कर जाधव अभिभाषणावरील चर्चेत सहभागी होताना म्हणाले की, या सरकारने ५ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५ वा. शपथ घेतली. साधारणतः राज्यात निवडणूक झाली की राज्यपाल सर्वात जास्त आमदार असलेल्या पक्षाला सरकार स्थापन करण्यासाठी निमंत्रित करतात. राज्यपालांनी निमंत्रित केले नाही तर सरकार स्थापन करू इच्छिणाऱ्या पक्षाला आपल्या समर्थक आमदारांची यादी घेऊन राज्यपालांना भेटावे लागते. त्यांना आम्ही सरकार स्थापन करू इच्छितो, आम्हाला निमंत्रित करा असे सांगावे लागते.

त्यानंतर राज्यपालांनी शपथविधीची तारीख जाहीर करायची असते. नव्या सरकारचा अमूक दिवशी, अमूक वेळी शपथविधी होईल अशी अधिसूचना काढावी लागते. त्यातही शपथविधीचे स्थान बदलायचे असेल तर तशी विनंती राज्यपालांना करावी लागते.

राज्यपाल हे घटनात्मक पद आहे असे मानले जाते. मी टीका करत नाही, पण आपण घटनेचे महत्त्व किती किमी करत आहोत? राज्यपाल पद हे घटनात्मक पद आहे की नाही? हे मुख्यमंत्र्यांनी आपल्या प्रत्युत्तरात स्पष्ट करावे. राज्यपालांनी तुम्हाला केव्हा बोलावले? तुम्ही राज्यपालांकडे यादी घेऊन कधी गेलात? हे महाराष्ट्राला सांगावे. तुम्ही राज्यपाल महोदयांकडे गेला नाहीत अशी माझी माहिती आहे, असे भास्कर जाधव म्हणाले.

ते पुढे म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांची ४ डिसेंबर २०२४ रोजी पक्षनेतेपदी निवड झाली. त्यानंतर तिन्ही पक्षाचे नेते राज्यपालांकडे गेले. त्यांनी दावा सादर केला. पण आझाद मैदानावर त्यापूर्वीच शपथविधी सोहळ्याच्या मंडपाचे काम सुरू झाले होते. मग तिथे शपथविधी घ्यायचा हे कुणी ठरवले? राज्यपाल हे घटनात्मक पद असेल तर त्याचा अधिकार काय? हा माझा धोरणात्मक प्रश्न आहे.

२२ मुख्यमंत्री पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री, केंद्रीय मंत्री यांच्या दौऱ्याच्या तारखा जाहीर झाल्या. त्यानंतरही राज्यपालांनी शपथविधीची अधिसूचना काढली नाही. राज्यपालांना किती गृहित धरावे? राज्यपाल कुठल्यातरी एका पक्षाचे असतात हे मला मान्य आहे, पण त्या खुर्चीवर बसल्यानंतर किमान त्या पदाचा मानसन्मान राखला पाहिजे. या पदाचे महत्त्व राखण्याचे भान राज्यपालांना आहे की नाही? असा सवाल भास्कर जाधव यांनी यावेळी उपस्थित केला.

भास्कर जाधव यांच्या या विधानावर भाजप आमदार अतुल भातखळकर यांनी पॉईंट ऑफ ऑर्डरद्वारे आक्षेप घेतला. भास्कर जाधव हे राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करत आहेत की? ते वैफल्यग्रस्त झालेत? यावर मी बोलणार नाही. पण राज्यपाल हे एका पक्षाचे आहेत, हे त्यांचे वाक्य रेकॉर्डवरून काढून टाकले जावे, असे ते म्हणाले.

त्यानंतर मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही भास्कर जाधव यांच्यावर निशाणा साधला. अध्यक्षांच्या निर्णयानंतरही विरोधी पक्षांचा आक्षेप कळत नाही. ते एवढे वैफल्यग्रस्त झालेत की अध्यक्ष बोलत आहेत याचे भानही त्यांना राहिले नाही. राज्यपालांवर आक्षेप घेणे अत्यंत चुकीचे कृत्य आहे. सर्वांनी सभागृहाच्या परंपरा जपल्या पाहिजेत. नव्या सदस्यांना प्रथा परंपरा माहिती नसतात. पण भास्कर जाधव हे ज्येष्ठ सदस्य आहेत. त्यांनी सभागृहाची प्रतिमा जपली पाहिजे, असे ते म्हणाले. त्यांच्या या विधानानंतर त्यांची व भास्कर जाधवांसोबत शाब्दिक चकमक झाली. राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांनीही या प्रकरणी भास्कर जाधव यांच्यावर निशाणा साधला. तसेच त्यांचे काही आक्षेपार्ह वाक्य कामकाजातून वगळण्याची मागणी केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १७ डिसेंबर २०२४





## लढा मंत्री पदाचा नाही तर अस्मितेचा : छगन भुजबळ

**येवला :** आपण शून्यातून लढा देऊन निर्माण करणारे लोक आहोत. त्यामुळे आपण पुन्हा लढू, हा लढा हा मंत्री पदाचा नाही तर हा लढा अस्मितेचा आहे, असे प्रतिपादन राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी केले. माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी आज येवला संपर्क कार्यालयात पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक घेऊन संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी माजी खासदार समीर भुजबळ, माजी आमदार कल्याणराव पाटील, प्रदेश सरचिटणीस दिलीप खैरे, ज्येष्ठ नेते तात्यासाहेब लहरे, विश्वासबापू आहेर, डी.के.जगताप यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, आपण अनेक मंत्री पदावर काम केलं आहे. गेली ४० वर्षांहून अधिक काळापासून आपण काम करतो आहोत. त्यामुळे हा प्रश्न मंत्री पदाचा नाही. आपला हा लढा अस्मितेचा लढा आहे. त्यामुळे सर्वांनी एकसंघ राहून काम करावे. मतदारसंघातील जनतेला विश्वासात घेतल्याशिवाय कुठलाही निर्णय आपण घेणार नाही असे त्यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले की, येवला लासलगाव विधानसभा मतदारसंघातील सर्व जनतेने विशेष मेहनत घेऊन मला पाचव्यांदा संधी दिली. त्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो. मतदारसंघाच्या विकासासाठी सर्वांना सोबत घेऊन आपल्याला काम करायचे आहे. मांजरपाड्याच्या माध्यमातून येवल्याला अधिक पाणी देण्याचा शब्द आपण येवलेकरांना दिला आहे. तो पुढील काळात आपल्याला पूर्ण करायचा आहे. मतदारसंघाच्या विकासासाठी आपण कटिबध्द असून विकासाची कामे अविरतपणे सुरू राहतील. येवला लासलगाव मतदारसंघ आपल्याला एकसंघ ठेवायचा आहे. आगामी काळात येवला मतदारसंघात सुरू असलेली विकासाची कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात येतील, असे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी स्पष्ट केले.

यावेळी ओबीसींच्या प्रश्नांसाठी लढणाऱ्या माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळातून डावलल्याने पदाधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त करत आम्ही सदैव आपल्या सोबत असल्याच्या भावना यावेळी व्यक्त केल्या. तसेच भुजबळ साहेब आगे बढो हम तुम्हारे साथ है, ओबीसीची एकच चळवळ, छगन भुजबळ छगन भुजबळ अशा विविध घोषणांनी कार्यालय परिसर दणाणून सोडला. तसेच माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांना सन्मानपूर्वक मंत्रिमंडळात घ्या, अशी मागणी उपस्थितांनी केली.

## संविधान प्रेमी जनतेच्या वतीने मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर

**खामगाव :** परभणी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळील संविधान प्रतीचे एका माथेफिरू कडून झालेल्या विटंबना अवमान करण्यात आला.

या प्रकरणातील आंदोलनामध्ये शहीद सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्येची सखोल चौकशी होऊन जबाबदार असणाऱ्यांना कठोर शिक्षा व्हावी,अशी मागणी संविधान प्रेमी सर्व जनतेच्या वतीने १६ डिसेंबर रोजी मुख्यमंत्री यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

परभणी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळील संविधानाच्या उद्देशिकेच्या शीला लेखाची समाज कंटकाने विटंबना केल्याने प्रचंड जनक्षोभ निर्माण झाल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या उद्देशिकेची विटंबना करण्यास अटक केली असले तरी दलित वस्तीमध्ये पोलिसांचे कोम्बिंग ऑपरेशन सुरू आहे अनेक निरपराध लोकांना अटक करणे सुरू आहे.

विटंबना करणाऱ्यांची नार्को टेस्ट करून त्यांच्या पाठीमागे असलेल्या मास्टर माईंड चा शोध घेण्यात यावा व त्यांना अटक करावी सदर प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्यात यावे. दलित वस्तीमध्ये चालविलेले कोम्बिंग ऑपरेशन थांबविण्यात यावे.

महाराष्ट्रातील सर्व महापुरुषांचे पुतळे व संविधान स्तंभांना संरक्षण देण्यात यावे आंदोलनामध्ये शहीद सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्येची सखोल चौकशी करण्यात यावी या मागण्यांचा समावेश करण्यात आला आहे. या निवेदनावर खामगाव शहर व तालुक्यातील संविधान प्रेमी जनतेच्या सह्या आहेत. खामगाव येथे परभणी घटनेचा निषेध करताना संविधान प्रेमी बांधव.